पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सामाईक कार्यासनांचा कार्यभार पर्यटन विभागातील उपसचिवांकडे सोपविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

शासन निर्णय क्र.टीडीएस २०२५/१२/प्र.क्र.२०२/पर्यटन-१,

दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६

वाचा -:
१. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.आस्था-२०१७/प्र.क्र.१८२ (भाग-१)/आस्था, दिनांक १८/०१/२०२२
२. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६८ /आस्थापना, दिनांक २३/०५/२०२३
३. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६८ /आस्थापना, दिनांक १२/०७/२०२३
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण १३२६/प्र.क्र.६८/प्रशा-१, दिनांक २४/०६/२०२६
५. अपर मुख्य सचिव (पर्यटन) यांचे अध्यक्षतेखालील बैठक दिनांक ०२.०७.२०२६
६. अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.शाकानि २०२६/ प्र.क्र.३२/रवका-१, दिनांक १४/०८/२०२६

प्रस्तावना :-

मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०९/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२४/०६/२०२६ च्या शासन निर्णयान्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे विभाजन करून 'पर्यटन विभाग' आणि 'सांस्कृतिक कार्य विभाग' असे दोन स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आले आहेत. तसेच, या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना आणि सामाईक पदांच्या प्रभार वाटपाचे सूत्र (Pro Rata Basis) निश्चित करण्यात आले आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २४/०६/२०२६ च्या शासन निर्णयानुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे विभाजन करून 'पर्यटन विभाग' आणि 'सांस्कृतिक कार्य विभाग' असे दोन स्वतंत्र विभाग निर्माण करण्याची तसेच, सामाईक पदांच्या वाटपाची कार्यवाही तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या, दिनांक १४/०८/२०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेतील महाराष्ट्र शासन कार्यनियमावली (चौथी सुधारणा) नियम २०२६मध्ये पर्यटन मूळ(Parent) विभाग म्हणून अनुक्रमांक २९ वर आणि सांस्कृतिक कार्य विभाग हा नव्याने निर्माण झालेला विभाग म्हणून अनुक्रमांक ४८ वर दर्शविण्यात आला आहे. तसेच, मा. मुख्य सचिवांच्या कार्यालयात दिनांक १३/०८/२०२६ रोजी आयोजित बैठकीच्या सुचनेत देखील पर्यटन विभाग मूळ विभाग दर्शविण्यात येऊन, 'सांस्कृतिक कार्य विभाग' हा नव्याने निर्माण झालेला व वेगळा झालेला विभाग असल्याचे नमूद आहे.

४. उपरोक्तनुसार, पर्यटन विभाग हा मूळ (Parent) विभाग असल्याने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २४.०६.२०२६ च्या शासन निर्णयानुसार पुढील आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याच्या अनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सामाईक कार्यासने अधिकारी व कर्मचारी यांच्या मंजूर पदांसह पर्यटन विभागाकडे वर्ग करण्याची शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वाचा क्रमांक ६ येथील अधिसूचनेनुसार, पर्यटन विभाग हा मूळ (Parent) विभाग असल्याने, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील आस्थापना,अर्थसंकल्प,रोखशाखा,समन्वय व नोंदणीशाखा/ गृह व्यवस्थापन रोखशाखा या ५ सामाईक शाखा/कार्यासनांचा कार्यभार सदर कार्यासनांसाठीची मंजूर पदे व त्यानुषंगाने सद्यस्थितीत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेसह पर्यटन विभागातील उपसचिवांकडे सोपविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कार्यासनांची रचना खालील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे:-

<table>
<tr><th>क्र.</th><th>कार्यासने</th><th>कार्यरत रचना/अधिकारी</th><th>प्रस्तावित रचना/अधिकारी</th></tr>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">आस्थापना</td><td>श्रीम. नंदा राऊत, उप सचिव</td><td rowspan="4">श्री. संतोष रोकडे, उप सचिव
श्रीम.स्मिता राणे, अवर सचिव</td></tr>
<tr><td>श्रीम. गिता यादव, अवर सचिव</td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">नोंदणीशाखा/ गृह व्यवस्थापन</td><td>श्री. महेश वाव्हळ, उप सचिव</td></tr>
<tr><td>श्री. सुमंत पाष्टे, अवर सचिव</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">रोखशाखा</td><td>श्रीम. नंदा राऊत, उप सचिव</td><td rowspan="6">श्री. विजय पोवार, उप सचिव
श्री. सुमंत पाष्टे, अवर सचिव</td></tr>
<tr><td>श्री. बाळासाहेब सावंत, अवर सचिव</td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">अर्थसंकल्प</td><td>श्री. महेश वाव्हळ, उप सचिव</td></tr>
<tr><td>श्री. बाळासाहेब सावंत, अवर सचिव</td></tr>
<tr><td rowspan="2">५</td><td rowspan="2">समन्वय</td><td>श्री. महेश वाव्हळ, उप सचिव</td></tr>
<tr><td>श्री. सुमंत पाष्टे, अवर सचिव</td></tr>
</table>

३. सदर शासन निर्णयापूर्वी रोखशाखेमार्फत सुरु असलेल्या देयके व इतर वित्तीय बाबींबाबतची कार्यवाही पुर्वीच्या नियुक्त अधिकाऱ्यांमार्फतच पुर्ण करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४१७३७०४७६५० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY JAGANNATH KHANDARE
Date: 2026.08.24 17:38:06 +05'30'

(संजय जगन्नाथ खंदारे)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. सर्व उप सचिव,अवर सचिव,कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
६. सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
७. निवडनस्ती (पर्यटन-१)